



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १४ डिसेंबर, १९४९ | अंक ५८


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर.*

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B, मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१५,५२५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८९, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पॅटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

४८० पानांचा अंक; ६१, ८८१ इंच जाहिराती.—फोर्टवर्थ, टेक्सस, येथील "स्टार टेलिग्राम" ह्या वृत्तपत्रानें त्या शहराच्या स्थापनेच्या शतसांवत्सरिक उत्सवाचे निमित्तानें ४८० पानांचा अंक प्रसिद्ध केला. त्यांत एकूण ६१, ८११ इंच जाहिराती होत्या २७२ सबंध पानी जाहिराती होत्या.

**गांधी खून खटल्यांतील वकिलांची प्राप्ती**—गांधी खून खटल्यांत सरकारतर्फे काम चालविणारे प्रमुख वकील श्री. सी. के. दप्तरी ह्यांना सरकारनें ३,८६,२१३ रु. दिले. त्यांचे मदतनीस श्री. पेटीगारा ह्यांना १,३६,३४३ रु. मिळाले आणि श्री. शहा ह्यांच्या वांट्यास १,०३,२८३ रु. आले.

**नव्या चलनी नोटा**—२६ जानेवारी रोजीं नव्या चलनी नोटा प्रसृत केल्या जातील. ह्या नोटांवरील राजाच्या मुखवट्याची जागा अशोक स्तंभानें घेतली आहे. नवीं नाणीं तयार होत आहेत, परंतु तीं प्रसृत होण्यास अद्याप अवकाश आहे.

**कंपनी कायदा दुरुस्ती : मत देण्यास मुदत वाढ**—कंपनी कायद्यावरील दुरुस्तीचा हिंदुस्थान सरकारचा मेमोरँडम ऑक्टोबरमध्यें प्रसिद्ध करण्यांत येऊन त्यावर १५ डिसेंबर १९४९ पूर्वी मतें मागविण्यांत आलीं होतीं. आतां त्याची मुदत १५ फेब्रुआरी १९५० अखेर वाढविण्यांत आली आहे.

**जयशंकर मिल्स बार्शी लि.**—वरील कंपनीस ३० सप्टेंबर १९४९ अखेर संपलेल्या वर्षी १,८८,२५३ रु. तोटा आला आहे. अहवालाचे वर्षी मध्यंतरी पांच महिने सुताचा साठा पडून राहिला आणि गिरणी चालू ठेवण्यासाठी कर्जाचा अवलंब करावा लागला.

**आतां ४०० हून कमी इंग्रज अधिकारी उरले**—हिंदी आरमार लष्कर व हवाई दलांत मिळून आतां ३७७ ब्रिटिश अधिकारी उरले आहेत. त्यांपैकी ७५% अधिकाऱ्यांकडे तांत्रिक व शिक्षकी काम आहे. ह्याखेरीज १०० इंग्रज अधिकारी मुलकी खात्यांत काम करीत आहेत.

**इंडस्ट्रिअल स्टॅटिस्टिक्स् कायद्याखालीं शिक्षा**—१९४२ च्या इंडस्ट्रिअल स्टॅटिस्टिक्स कायद्यानुसार आवश्यक आंकडेवारीचे तपशीलवार असे तक्ते सादर न केल्याबद्दल भिवंडी येथील खुशाल वीव्हिंग फॅक्टरी, अहमदनगर येथील पारीख वीव्हिंग मिल्स, मुंबई येथील दि नॅशनल स्टील रोलिंग शटर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी आणि चाळीसगांव येथील गोवर्धनदास हिरालाल अँड कंपनी (तेलाची गिरणी) ह्या कंपन्यांच्या व्यवस्थापकांना मुंबई चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टानें शिक्षा केल्या. ह्या कंपन्यांना १९४६–४७ व ४८ सालांसाठीं ५० रुपयांपासून १५० रुपयांपर्यंत दंड करण्यांत आले.

**लॉर्ड नफील्ड ह्यांची देणगी**—मद्रास प्रांतांतील क्रोमपेट येथील तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थेला, इंग्लंडचे सुप्रसिद्ध मोटार कारखानदार लॉर्ड नफील्ड ह्यांनीं १०० पौंड किंमतीचें मोटारीचे सुटे भाग देणगीदाखल दिले आहेत. मोटारीसंबंधींच्या प्रयोगशाळेसाठीं देण्यांत आलेल्या ह्या देणगीचा साभार स्वीकार करून संस्थेला मोठी देणगी देण्याविषयीं लॉर्ड नफील्ड ह्यांना विनंति करण्यांत आली आहे.

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. ३ जानेवारी १९५० पासून नं. ५ बैरामजी जीजीभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को-ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खाते येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९४९ च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

## THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, Ltd. POONA 2.

## NOTICE.

The Fifteenth Annual General Meeting of the Shareholders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Saturday the 31st December, 1949, at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business:—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September, 1949.
(2) To sanction the payment of a Dividend for the above mentioned period.
(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.
(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

POONA 2. Dated 4th Decr. 1949.

By order of the Board of Directors
C. G. AGASHE & CO.,
MANAGING AGENTS.

*NOTE*:—The Transfer Books of the Company will be closed from 16th December, 1949 to 7th January 1950 (both days inclusive). The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd., Poona 2, on and after 7th February 1950.

# अर्थ

बुधवार, ता. १४ डिसेंबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. बाबासाहेब डहाणूकर ह्यांची षष्ट्यब्दिपूर्ति

### स्फूर्तिदायक कामगिरी

महाराष्ट्रीय कारखानदारांतील अग्रेसर आणि भारतीय कारखानदारांतीलहि एक उच्च श्रेणीचे उद्योगपति, श्री. लक्ष्मण महादेव डहाणूकर ह्यांच्या वयाला १२ डिसेंबर, १९४९ रोजीं ६० वर्षें पुरीं झालीं. त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या मंगल प्रसंगीं श्री.बाबासाहेबांचें अभिनंदन करून त्यांना दीर्घायुरोग्य चिंतण्यास आम्हांस अत्यंत आनंद वाटत आहे. "व्यापार धंद्याच्या बाबतींत महाराष्ट्रांतलि परिस्थिति लक्षांत घेतां, ज्या महाराष्ट्रीयांनीं धैर्यानें आणि चिकाटीनें धंद्यांच्या क्षेत्रांत पहिलीं पाऊलें टाकलीं त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. अशा कारखानदारांत श्री. डहाणूकर ह्यांचा समावेश होतो." पंतप्रधान श्री. खेर ह्यांनीं वरीलप्रमाणें आपले विचार "व्यापार–उद्योगा"च्या डहाणूकर विशेषांकांत काढले आहेत, ते औचित्यपूर्ण आहेत. ह्या दृष्टीनेंच श्री. बाबासाहेबांच्या यशस्वी जीवनक्रमाकडे पाहिलें पाहिजे आणि त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा सर्वांनीं करून घेतला पाहिजे.

श्री. बाबासाहेब ह्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीस अनेक कारणांनीं महत्त्व आहे. त्यांनीं सामान्य परिस्थितींतून वर येऊन आपला स्वतःचा उद्धार घडवून आणला ही एकटी मोठी गोष्टही कमी महत्त्वाची नाहीं. परंतु त्यांनीं स्वतः पैसे मिळविण्याबरोबरच महाराष्ट्राला अनेक कारखाने स्थापून चालू करून दिले आणि स्वतःबरोबर महाराष्ट्राचें अर्थोत्पादनहि वाढविलें, ही कामगिरी अधिक मोलाची आहे. त्यांतील कांहीं कारखान्यांचें महत्त्व महाराष्ट्रापुरतें मर्यादित नसून, अखिल भारतांतहि त्यांस वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. अशा रीतीनें, श्री. बाबासाहेबांनीं कारखानदारीच्या संस्था निर्माण करून, उद्योगधंद्यांची महाराष्ट्रांत स्थापना करून त्यांची परंपरा वाढविण्याचें अत्यंत अवघड काम केलेलें आहे. निरनिराळ्या व्यापारी आणि कारखानदारी क्षेत्रांत श्री. बाबासाहेबांनीं कर्तबगारीचें जोरावर मोठें मानाचें स्थान मिळविलें आहे. मुंबईच्या शेरीफ पदाची जागा भूषविण्याचा मान त्यांना १९४७–४८ मध्यें लाभला, ह्या वरून मुंबई शहरांतील त्यांच्या उच्च स्थानाची सहज कल्पना येईल. त्या शहरांत महाराष्ट्रीय बहुसंख्याक असले तरी मानाच्या किंवा अधिकाराच्या जागा त्यांचे वाट्यास क्वचितच येतात. ह्या दृष्टीनें श्री. बाबासाहेबांच्या ह्या नेमणुकीचें विशेष महत्त्व आहे.

श्री. बाबासाहेबांचा अनेक औद्योगिक उपक्रमांशीं नेते ह्या दृष्टीनें संबंध आहे. महाराष्ट्र शुगर मिल्स लि., बेलवंडी शुगर फार्म लि., अमृत ऑईल मिल्स लि., दि युनायटेड कन्स्ट्रक्शन अँड एंजिनिअरिंग लि., वरळी केमिकल वर्क्स लि., हिंद रेझर अँड ब्लेड्स, इत्यादि नांवांवरून त्यांच्या कारखान्यांची कल्पना येईल आणि त्यांची विविधताहि लक्षांत येईल. महाराष्ट्रीयांना अभिमान वाटावा, अशीच त्यांची कामगिरी आहे. "महाराष्ट्रीयांत बुद्धी व कर्तृत्व हा दोन्हीं आहेत, परंतु त्यांचा उपयोग व्यापार व उद्योगधंद्यांत अधिकाधिक केल्यास ते खात्रीनें स्वतःची आर्थिक उन्नति अधिक करून घेतील. अशा रीतीनें आपल्या प्रांताच्या व पर्यायानें देशाच्या उन्नतींतहि ते भर घालूं शकतील." श्री. बाबासाहेबांचे हे उद्गार त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष कृतीनें यथार्थ करून दाखविलेले आहेत. "मिळविलेलें पचवावें व त्यांतून नवीन निर्माण करावें" ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. घाईघाईनें उद्योगपती होऊं पहाणाऱ्या उतावीळांना हें रहस्य विशेष मार्गदर्शक होईल.

**अमेरिकेची लोकसंख्या**—ऑक्टोबर १, १९४९ ह्या दिवशीं अमेरिकेची लोकसंख्या १४,९९,४७,००० इतकी झाली आहे असें अधिकृत रीत्या प्रकट करण्यांत आलें आहे. त्यानंतर एकूण लोकसंख्या १५ कोटीच्यावर गेली असावी असा अंदाज आहे. ह्या गणनेंत ४,८७,००० लष्करांतील माणसें जमेला धरण्यांत आलीं आहेत.

**नवीन प्रकारचा साबण**—लिव्हर ब्रदर्स ह्या कंपनीनें एक नवीन प्रकारचें धुण्याचें साबण काढलें असून त्याची विक्री आतां अमेरिकेंत सुरू झाली आहे. हा साबण वापरल्यामुळें साबण लावल्यावर ते कपडे पुन्हां स्वच्छ पाण्यांत खळबळावे लागत नाहींत. साबणाच्या पाण्यांतून काढून कपडे पिळले कीं ते ताबडतोब वाळत टाकतां येतात; त्यामुळें घरचें धुणें पूर्वीपेक्षां निम्या वेळांत आणि श्रमांत होऊं लागलें आहे.

**शेतीच्या हत्यारावरील विक्रीकर माफ**—अधिक धान्य पिकविण्याच्या मोहीमेला उत्तेजन देण्यासाठी पूर्वपंजाब सरकारनें शेतीच्या कांहीं अवजारांवरील विक्रीकर माफ केला आहे. ह्या हत्यारांत पुढील वस्तूंचा समावेश करण्यांत आला आहे. गुऱ्हाळाचा चरक, रसाच्या काहिली, नांगर, गवत कापण्याचीं यंत्रें, कुदळी, कोयतें, खुरपीं इत्यादि.

**उतारूंसाठी साबण व टॉवेल**—उतारूंच्या सोईसाठी इंग्लंडमधील १२ प्रमुख एक्सप्रेस आगगाड्यांतून साबण व कागदी टॉवेल पुरविण्याचें ठरलें आहे.

**प्रजोत्पादनाचें नियंत्रण**—बर्मिंगहॅमच्या बिशपनीं आपल्या एका भाषणांत असें प्रतिपादन केलें कीं, प्रजोत्पादनाला अयोग्य असलेल्या स्त्री–पुरुषांना संतति उत्पन्न करण्यास असमर्थ केलें पाहिजे. परंतु ह्याचा अर्थ श्रीमंतांचें जतन करणें आणि गरिबांची वासलात लावणें असा मात्र नव्हे. लोकसंख्या कमी करण्यांत, चांगल्या प्रतीच्या लोकांची वाढ करून कमी प्रतीच्या लोकांची संख्या कमी करण्याचें धोरण असलें पाहिजे.

**तागाची गरज भागविणारी वनस्पति**—पुढील खरीप पिकांच्या हंगामाच्या वेळीं मुंबई प्रांतांत १०,००० एकर जमिनींत तागाची जरूर भरून काढणाऱ्या एका प्रकारच्या वनस्पतीची लागवड करण्यांत येणार आहे. ह्या वनस्तीचें नांव हिबिस्कस कॅनाबिनस, ऊर्फ मेस्टा असें आहे. ह्या वनस्पतीचे तागांत २० टक्के मिश्रण करून तो ताग वापरतां येण्यासारखा आहे. ही वनस्पती १० ते १२ फूट उंच वाढते आणि तिचा धागा चांगला निघतो. ह्या नव्या लागवडीमुळें अन्नधान्याच्या लागवडीखालील जमीन कमी होणार नाहीं.

## खेडेगांवी प्रदेशांतील बँकिंगच्या सोयी

(लेखक:—श्री. जी. ए. भोंसुले, मॅनेजर, सी. पी. अँड बेरार प्रॉ. को. बँक लि., नागपूर)

गेल्या सात वर्षांत शेतकऱ्यांना त्यांनीं पिकविलेल्या मालास चांगली किंमत मिळाली, म्हणून त्यांचेजवळ मोठाल्या रकमा शिलक पडल्या आहेत, अशी कल्पना आहे. मोठ्या शेतकऱ्यांचे बाबतींत हें कांहींसें सत्य आहे, परंतु लहान शेतकऱ्यांना फारशी बचत करता आलेली नाहीं. बचत केलेले पैसे आकर्षण्याचें काम इंपीरिअल बँक व जॉ. स्टॉ. बँका करूं शकणार नाहींत. कारण, एक तर त्यांचा व्यवस्थाखर्च फार मोठा असतो आणि दुसरें म्हणजे त्यांचा खेडेगांवी जनतेशीं प्रत्यक्ष परिचय नसून त्यांची त्यांना चांगली माहितीहि नाहीं. खेडेगांवांतील सावकारांपैकी कांहींचे व्यवहार शेतकऱ्यांना पूर्वी उपकारक झाले असले, तरी त्यांच्या व्यवहाराच्या पद्धति उद्दिष्ट साधण्यास पोषक नाहींत. सहकारी बँकाच हें काम योग्य तऱ्हेनें करूं शकतील आणि त्यांना पुरेशी सरकारी मदत मिळाली, म्हणजे खेडेगांवी प्रदेशांतील बँकिंगच्या सोईचा प्रश्न सत्वर आणि समाधानकारक रीतीनें सुटूं शकेल. प्रांतिक बँकांनीं व जिल्हा मध्यवर्ती बँकांना ५ हजार लोकवस्तीच्या गांवीं शाखा उघडण्याची परवानगी देण्यांत यावी. सरकारनें बिन व्याजी सरकारी कांहीं किमान शिलका ठेवून ट्रेझरींचें काम, तकावी व इतर सरकारी कर्जे देणें व त्यांची वसुली बँकांकडे सोपविणें इत्यादि गोष्टी आवश्यक आहेत. बँकांच्या शाखा चालविण्यासाठी येणाऱ्या तुटीची जबाबदारीहि सरकारवर रहावी. बँकांच्या नोकरवर्गास पगार देण्याचे बाबतींत मात्र कंजुषपणा केला जाऊं नये. बँकांना स्थानिक व्यापाऱ्यांना कर्जे देण्याची परवानगी असावी. पत्रकें काढून व अन्य मार्गांनीं बचत बँकांकडे आकर्षण्यासाठी प्रचार करावा. रंगीबेरंगी "बचत पेट्या" शेतकऱ्यांना देण्यांत याव्या. त्यावर मिना रंगांत पुढाऱ्यांचे फोटो असावेत. खेडेगांवांतील जमीनदारांचे वाड्यांत शाखा ठेवाव्यात, म्हणजे तळघरांत तिजोऱ्या ठेवता येतील. संरक्षक सरकारी खर्चानें मिळावेत. पैसे इकडून तिकडे न्यावे लागतील, त्यांच्या विम्याचा खर्च सरकारनें सोसावा. ठेवी काढण्याचें व ठेवण्याचें काम सोपें करण्यांत यावें. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टांतून सहकारी बँकांना वगळण्यांत यावें. शाखांची व्यवस्था सेवानिवृत्त सरकारी नोकरांकडे दिली म्हणजे पगारांत बचत होईल. स्थानिक सल्लागार मंडळें नेमावींत. तपासणीसाठी बँकांनीं पुरेसे इन्स्पेक्टर नेमावेत; त्यांच्या खर्चाचा मुख्य भार सरकारनें सोसावा. सहकारी बँकांच्या शाखांचें जाळें सर्वत्र पसरल्यानंतर, तकावी व इतर सर्व कर्जे त्या बँकांमार्फत सरकारनें द्यावीं व त्यांच्या वसुलीचे व इतर अधिकारहि द्यावे. कर्जे देण्याचा व तीं वसूल करण्याचा हे मोसम वगळून ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें उरलेल्या सुमारें दोन महिन्यांत नोकरांना सुटी दिली म्हणजे हक्काची वेगळी रजा देण्याचें प्रयोजन नाहीं.

प्रारंभीं शेतकऱ्यांच्या बचतीचा पैसा आकर्षणें कठीण जाईल, परंतु त्याचें महत्त्व शेतकऱ्यांना पटलें म्हणजे तेच स्वतः बँकांकडे जाऊं लागतील. प्रत्येक खेड्यांतून दरसाल सरासरीनें २,००० रु. मिळाले, तर ५½ लक्ष खेड्यांतून दरसाल १०० कोटी रुपयांवर पैसे जमा होऊं शकतील. ही कांहीं लहान रकम नाहीं. ठाकूरदास कमिटीचे सभासद निष्णात व अनुभवी असल्यानें, तिच्या शिफारसी मौल्यवान होतील, ह्यांत संशय नाहीं. सरकारनें त्या सत्वर अमलांत आणण्याची व्यवस्था करावी.

## लिक्विडेटरला २,३०,००० रुपये देऊन संभाव्य जबाबदारींतून मुक्तता

### ए. बी. सी. बँक प्रकरण : कंपनी कायद्याच्या २८१ (२) कलमाचा फायदा

लिक्विडेशनमध्यें असलेल्या दि असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशनचे, सर फाझल इब्राहिम रहिमतुल्ला हे एक डायरेक्टर होते. त्यांची मुंबईचे शेरीफ म्हणून नुकतीच नेमणूक झाली आहे. त्यांनीं कंपनी कायद्याच्या २८१ (२) कलमाप्रमाणें मुंबई हायकोर्टाकडे अर्ज केला, तो मनोरंजक आहे.

"दुर्लक्ष, चुकारपणा, कर्तव्यच्युति, विश्वासभंग, ह्याबद्दल एकाद्यावर दावा असेल, आणि तो चालविणाऱ्या कोर्टाच्या मतें ह्या संबंधांत तो मनुष्य दोषी असेल किंवा कदाचित् ठरेल परंतु तो सच्चेपणानें व साधारणपणें योग्य रीतीनें वागला असेल आणि परिस्थितीचा एकंदर विचार करता तो माफीस पात्र होईल असें कोर्टाचें मत झालें, तर कोर्टास इष्ट वाटतील त्या अटींवर त्याची पूर्णपणें किंवा अंशतः जबाबदारींतून मुक्तता करतां येईल" (कलम २८१-१). "दुर्लक्ष, चुकारपणा, कर्तव्यच्युति किंवा विश्वासभंग ह्याबद्दल आपल्यावर भरपाईची जबाबदारी टाकण्यांत येण्याचा संभव आहे असें एकाद्यास वाटलें, तर तो कोर्टाकडे अर्ज करून दाद मागूं शकतो. प्रत्यक्ष त्याचेवर दावा आणला असतांना कोर्टास जे अधिकार असते, तेच अधिकार अशा अर्जाचे बाबतींत कोर्टास असतात." (कलम २८१-२)

"२८१ हें कलम (अ) कंपनीचे डायरेक्टर्स, (ब) कंपनीचे मॅनेजिंग एजंट व मॅनेजर, (क) कंपनीचे अधिकारी व (ड) कंपनीनें नेमलेले ऑडिटर्स, ते कंपनीचे अधिकारी असोत वा नसोत, ह्यांना लागू आहे." (कलम २८१-३)

"आपणांविरुद्ध २८१ कलमाप्रमाणें बँकेचे डायरेक्टर ह्या नात्यानें कांहीं भरपाईची मागणी केली जाण्याचा संभव आहे, परंतु आपण सच्चेपणानें व योग्य रीतीनें वागलों असल्यानें, कोर्टानें इष्ट त्या अटींवर आपणाला मोकळीक द्यावी." असा अर्ज सर फाझल रहिमतुल्ला ह्यांनीं मुंबई हायकोर्टाकडे केला. "एक-दोन प्रश्नांचा अर्जदारानें केलेला खुलासा समाधानकारक नाहीं, परंतु एकंदरीनें पहातां त्यांचें वर्तन सच्चेपणाचें व योग्य होतें," असा अभिप्राय न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांनीं व्यक्त करून खालीलप्रमाणें हुकूम केला:—

"अर्जदारानें ऑफिशिअल लिक्विडेटरला २,३०,००० रु. द्यावेत. हे त्यानें दरमहा ५०,००० रुपयांच्या हप्त्यांनीं द्यावेत. हप्ता ५ जानेवारी, १९५० रोजीं सुरू व्हावा. म्हणजे मग, अर्जदारावर कोणत्याहि प्रकारची जबाबदारी रहाणार नाहीं."

### बनावट नाण्यांत चवल्या ज्यास्त

ट्रेझरी व रेल्वे स्टेशन्स येथें १९४८-४९ मध्यें कापण्यांत आलेल्या बनावट नाण्यांचा तपशील खालीं दिला आहे.

| | चांदी | निकेल |
|---|---|---|
| रुपये | ९,७४२ | १,२९१ |
| अधेल्या | १०,८१७ | ४,१९८ |
| पावल्या | ११,३२१ | ७,७६२ |
| चवल्या | १,३९३ | १,०३,९६९ |
| आणेल्या | — | १०,९९५ |
| अर्धा आणेल्या | — | २९ |
| एकूण | ३३,२७३ | १,२८,२४४ |

## अवमूल्यनानंतरहि वाढत जाणाऱ्या किंमती

पौंड व रुपया यांच्या अवमूलनानंतर डॉलर–गटांतील माल महाग होईल याची सर्वांनाच कल्पना होती. परंतु केवळ डॉलर मालाच्याच किंमती वाढल्या एवढेंच न होतां इतर कांहीं मालाच्या किंमतींतहि वाढ झाल्याची बातमी आली आहे. उदाहरणार्थ, अँग्लो–इराणी तेल कंपनीनें आपल्या तेलाची किंमत ४४ टक्क्यांनीं वाढविली आहे व ह्या वाढीला अधिकृत मान्यताहि मिळाली आहे. तेलाचा दर वाढविण्याचें कारण एवढेंच दिसतें कीं ह्या तेलाला कायम व निश्चित स्वरूपाचें गिऱ्हाईक आहे व ह्यामुळें तेलाची किंमत आजच्या बाजाराच्या परिस्थितीचा फायदा घेऊन वाढविण्यांत आली आहे. अशाच प्रकारचें धोरण ऑस्ट्रेलियानें गव्हाच्या बाबतींत स्वीकारलें आहे. आजच्या जागतिक परिस्थितीचा फायदा घेऊन ऑस्ट्रेलियानें गव्हाची किंमत वाढविली आहे. याचें कारण एवढेंच कीं सध्या सर्व जगांत अजून अन्नटंचाई असल्यामुळें गव्हासारख्या उच्च दर्जाच्या पिकाला विशेष मागणी आहे. तेव्हां गव्हाची किंमत थोडी वाढविली तरी गहू निश्चितपणें खपूं शकेल अशी ऑस्ट्रेलियाची वाजवी अपेक्षा आहे. हिंद सरकारनेंहि अशाच प्रकारें विचार करून हिंदच्या ज्या मालाला जागतिक बाजारपेठेंत निश्चित मागणी आहे अशा मालाच्या निर्गतीवरील जकात वाढविली आहे. त्यामुळें हिंदच्या हातांत जास्त रुपये येऊं शकतील. ताग, चहा, अभ्रक, मिरी व मँगनीज या मालावरील निर्गत जकात वाढविली. याचा परिणाम असा होईल कीं हा माल स्टर्लिंग गटांतील देशांनाहि आतां महाग पडेल.

अशा प्रकारच्या किंमती वाढविण्याच्या धोरणाचा सरसकट अवलंब केला गेल्यास त्याचा परिणाम एकंदरींत चांगला होणार नाहीं. कारण, आवश्यक व महत्त्वाचा माल स्टर्लिंग–गटांतील देशांनाहि महाग पडेल व आजच्या परिस्थितींत औद्योगिक जीवनाला आवश्यक अशा मालाच्या किंमती वाढत जातील. सध्यां सर्व ठिकाणीं मालाच्या किंमती वाढणार नाहींत यावर कटाक्ष पाहिजे. तरच सध्यां निर्माण झालेल्या परिस्थितीला स्टर्लिंग–गटांतील देशांना तोंड देतां येईल. आपणाला मिळणाऱ्या वैयक्तिक फायद्यामुळें एखाद्या देशानें किंवा मोठ्या कंपनीनें मालाच्या किंमती वाढविणें ही गोष्ट अजूनपर्यंत स्टर्लिंग गटांतील देशांत परिस्थितीला तोंड देण्यासाठीं दिसून आलेल्या एकजुटीशीं विसंगत आहे. एकंदर २४ देशांनीं आपल्या चलनाचें अवमूलन केलें. त्याचप्रमाणें स्टर्लिंग गटांत एकवाक्यता राखणाऱ्या कमिटीचें कार्यहि योग्यप्रकारें झालें. परंतु ह्या सर्व एकसूत्री धोरणावर वर उल्लेखिलेल्या किंमतीच्या वाढीमुळें विरजण पडणार आहे. कोणत्याहि परिस्थितींत स्टर्लिंग–गटांतील देशांनीं धोरणाचा एकसूत्रीपणा राखणें आवश्यक आहे. या धोरणाशीं विसंगत धोरण तात्पुरतें कांहीं देशांना फायदेशीर झालें तरी तें दीर्घ–परिणामाच्या दृष्टीनें अयशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीं. ज्यांच्या हातांत सत्ता आहे त्यानीं इतरांच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचें हें धोरण स्टर्लिंग–गटांतील कांहींनीं अवलंबिलेलें दिसतें हें एकंदरींत योग्य नव्हे.

भा. म. का.

---

**"मेड इन जपान" शिक्क्याची आवश्यकता नाहीं—** जपानमधून निर्गत होणाऱ्या सर्व मालावर "जपानी बनावट" असा शिक्का मारावा लागत असे. आयात करणारानें तशी विनंति केली तर हा शिक्का मारला नाहीं तरी चालेल, असा जनरल मॅक आर्थरनें हुकूम काढला आहे.

## पार्लमेंटांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

१९४८ सालीं आणि १९४९ च्या पहिल्या दहा महिन्यांत मिळून २,०४० नवीन पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं. ज्या खेडेगांवांतून पोस्ट ऑफिस उघडलें असतां वार्षिक ७५० रुपयांपेक्षां अधिक तोटा होणार नाहीं अशा खेडेगांवांतून पोस्टांची सोय करण्यांत आली. त्यापेक्षां अधिक तोटा येण्यासारख्या गांवांतून पोस्ट ऑफिसें उघडण्याचें सरकारनें नाकारलें.

× × ×

१९४८–४९ सालीं हिंदुस्थानांत ४०,०६५ एकर जमीन सहकारी पद्धतीनें लागवडीस आणण्यांत आली. ह्या आकड्यांत पूर्व–पंजाब आणि त्रावणकोर–कोचीन संस्थानमधील सहकारी शेती धरलेली नाहीं. त्यासंबंधींचे आंकडे मिळूं शकले नाहींत.

× × ×

परदेशांत निरनिराळ्या कारणांसाठी धाडण्यांत आलेल्या प्रतिनिधी मंडळांच्यासाठीं हिंद सरकारला १९४८–४९ सालीं २५,४३,००० रुपये खर्च आला. उलटपक्षीं, सरकारी कामाकरितां परदेशाहून हिंदुस्थानांत आलेल्या प्रतिनिधी मंडळांच्यासाठीं सरकारला ८,७५,००० रुपये खर्च करावे लागले.

× × ×

एप्रिल ते सप्टेंबर १९४९ ह्या कालांत हिंदमधून निर्यात झालेल्या निरनिराळ्या वस्तूंच्या मोबदल्यांत किती डॉलर्स मिळाले त्याची माहिती हिंदचे अर्थमंत्री श्री. के. सी. नियोगी ह्यांनीं सांगितली. डॉलर्सची रुपयांत किंमत दिली आहे. आंकडे लाख रुपयांचे आहेत. तागाचा माल १,७९५; मसाल्याचे पदार्थ १६६; अभ्रक १२६; लाख ११०, मँगनीज १४५; चामडी व कातडी ९२; कच्चा ताग ११; कापूस ३८; कॉटन वेस्ट २५; लोकरीच्या वस्तू ३०; इतर ३८१. अमेरिकेला केलेल्या चहाच्या निर्यातीमुळें २२० लाख रुपयांचें आणि कानडाला केलेल्या निर्यातीमुळें १३८ लाख रुपयांचे डॉलर्स हिंदला मिळाले.

× × ×

एअर इंडिआ इंटरनॅशनल ह्या कंपनीला ८ मार्च, १९४८ ते ३१ डिसेंबर, १९४८ पर्यंत ५३,९३,५६३ रुपये नुकसान आलें. कंपनीच्या वहातुकीला प्रारंभ झाल्यापासून गेल्या वर्षाअखेर ७,३२८ प्रवाशांची ने-आण करण्यांत आली. जास्तींत जास्त ८,३५८ प्रवाशांना प्रवास करविण्याची कंपनीची सिद्धता आहे. भाड्याच्या रूपानें १,३६,२९,००९ रुपयांचें उत्पन्न झालें. कंपनीचें भांडवल २ कोटी रुपयांचें आहे. त्यांत सरकारचें ९८ लाख रुपये आहेत. कंपनीला पेट्रोलच्या किंमतींत कांहींहि सवलत देण्यांत आलेली नव्हती.

---

**पॉवर अल्कोहोलची निर्मिती—**१९४७ सालीं हिंदुस्थानांत २२ लक्ष गॅलन पॉवर अल्कोहोलची निर्मिती झाली होती, तिचा आकडा १९४८ सालीं ३५½ लक्ष गॅलन झाला. १९४९ च्या ऑगस्ट अखेर पॉवर अल्कोहोलचें उत्पादन २१,६८,८६४ गॅलन झालेलें आहे.

**चेकोस्लोव्हाकियामधील विवाहाचा कायदा—**चेकोस्लोव्हाकियांतील विवाहाच्या नव्या कायद्यानें विवाहाच्या नोंदीची सक्ती केली असून काडीमोड ज्यास्त अवघड केला आहे. पत्नीला पूर्वीचें आडनाव लावण्याची परवानगी दिली आहे. आपल्या मुलांच्या आडनावाचा निर्णय दांपत्यानें आगाऊ करून ठेवला पाहिजे. औरस आणि अनौरस संततीचा दर्जा पूर्णपणें समान ठेवण्यांत आला आहे.

## दि बागाईतदार को. शुगर प्रोड्यूसर्स सोसायटी (फॅक्टरी) लि., लोणी बु॥.

### सहकारी तत्त्वावरील पहिला साखर कारखाना

वरील सोसायटीची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा ता. २-१०-१९४९ रोजीं लोणी येथें सोसायटीचे चेअरमन प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस फॅक्टरीचे सर्व सभासद, त्याचप्रमाणें श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगांव वगैरे भागांतील व आजूबाजूच्या गांवांतील सुमारें २ हजार मंडळी उपस्थित होती. प्रा. गाडगीळ आपल्या भाषणांत म्हणाले:-

### प्रा. गाडगीळ ह्यांचें भाषण

"या भागांत भांडवलदार लोकांनीं साखर कारखाने काढण्याचे प्रयत्न केले तेव्हां भांडवलदारांनीं कारखाने काढल्यास त्याचे शेतकऱ्यांचेवर अनेक प्रकारें अनिष्ट परिणाम होतील हें जाणून या भागांतील शेतकऱ्यांनीं तारीख १७-१२-४५ रोजीं धी डेक्कन कॅनाल्स बागाईतदार परिषदेमध्यें बेलापूर रोड येथें माझेच अध्यक्षतेखालीं, शेतकऱ्यांनींच सहकारी पद्धतीवर साखर कारखाना काढावा व सरकारची त्यास मान्यता मिळवावी असा ठराव केला गेला. त्या ठरावाची तंतोतंत अंमलबजावणी होऊन साडेतीन वर्षांनंतर मला या कारखान्याचे चेअरमन व्हावें लागेल ही कल्पनाही माझ्या मनाला त्या वेळीं शिवली नव्हती! परंतु श्री. विठ्ठलराव पाटील यांची भीड जशी तुम्हां सर्वांना व इतरांनाही मोडवत नाहीं, त्याप्रमाणें त्यांनीं मला फारच आग्रह केल्यामुळें मलाही त्यांची भीड मोडतां आली नाहीं."

प्रा. गाडगीळ ह्यांनीं, नंतर कारखान्याचें कामकाज प्रत्यक्ष चालू करण्यासाठीं सरकारकडून पहिल्या तीन वर्षांसाठीं बोर्ड नेमणें, योग्य अशा मशनरीची पहाणी करून ती खरेदी करणें, सन १९५० आक्टोबर मध्यें साखर तयार करण्याचा बोर्डानें केलेला निश्चय, वगैरे बाबींचा खुलासा केला. तसेच सरकारनें कारखान्यास कर्जरूपानें भांडवल न पुरवितां तें शेअर्स खरेदी करून पुरवावें व भागिदारी पत्करावी, या बाबतींत बोर्डानें धरलेल्या आग्रहाचा उल्लेख करून हिंदुस्थान सरकारच्या इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनकडून भांडवल व सहाय मिळणेंबद्दल केलेले प्रयत्न व त्यांत आलेलें यश हें विशद करून सांगितलें. या सर्व प्रयत्नांत विद्यमान अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता यांची कळकळीची सल्लामसलत व अचूक मार्गदर्शन फारच उपयोगी पडलें याचाहि त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला.

### शेतकऱ्यांना सल्ला

पुढें ते म्हणाले "कारखान्याचा मूळ हेतू साध्य होण्याच्या व कारखान्याच्या पुढील कार्याच्या दृष्टीनें कारखान्याच्या कार्यक्षेत्रांतील प्रत्येक लहान-मोठ्या ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यानें कारखान्याचे सभासद झाले पाहिजे आणि आक्टोबर १९५० पर्यंत योग्य जातीच्या उसाची वेळेवर लागण करून कारखान्याच्या सल्ल्यानें योग्य दर्जाचा ऊस तुम्हां तयार केला पाहिजे. उत्पादक सभासदांसाठीं आम्ही दहा लाख रुपयांचे शेअर्स राखून ठेवले आहेत. तें सर्व या भागांतील शेतकऱ्यांनींच खरेदी केले पाहिजेत. तरच सरकारनें दिलेली सवि आणि माझा खर्च होत असलेला वेळ यांचा खरा फायदा होईल. ज्याअर्थी आतांपर्यंत फक्त २०० सभासदांनीं पांच लाखांवेर शेअर्स खरेदी केले आहेत, त्याअर्थी आणखी ५००-६०० शेतकऱ्यांना पांच लाखाचे शेअर्स सहज खरेदी करतां येतील. शिवाय तुम्हा लोकांचा कारखान्याबद्दलचा विश्वास व निष्ठा या गोष्टी कौतुकास्पद आहेत. कारण तुम्ही लहान लहान शेतकऱ्यांनीं कारखाना मिळविण्याबद्दल प्रयत्न करण्यासाठीं म्हणून दोन-तीन लाख रुपये प्रत्यक्ष भांडवल जमवून तें सतत तीन चार वर्षें बँकेंत ठेवलें आहे. अशा तऱ्हेचें कार्य इतर भागांत शेतकऱ्यांनीं केल्याचें माझ्या बघण्यांत व ऐकण्यांतही नाहीं. तेव्हां हे शेअर्स तुम्ही स्वतः या भागांतील शेतकरीच खरेदी कराल अशी मला खात्री आहे. असे थोडे फार भांडवल जमवून व अनेक शेतकरी एके ठिकाणीं येऊन आपण एक कारखाना काढीत नसून, खरें म्हणाल तर, सरकार मोठ्या प्रमाणांत सामुदायिक पद्धतीनें शेती करण्याच्या ज्या योजना आंखीत आहे त्या आपण सुसंबद्ध, पद्धतशीरपणें प्रत्यक्ष अमलांत आणीत आहोंत आणि या दृष्टीनेंच हें कार्य फार महत्त्वाचें आहे."

### आमदार गिरमे ह्यांचें भाषण

आमदार रामभाऊ गिरमे आपल्या भाषणांत म्हणाले कीं, पूर्वी साखर कारखाने काढले त्यावेळीं ऊंस शेतकऱ्यांचा आणि कारखाने भांडवलदारांचे अशी परिस्थिति होती. त्यानंतर कारखान्यांचेच ऊस असावेत म्हणून कारखान्यांनीं जमिनी खंडानें घेऊन स्वतःच लावणेचा प्रघात पाडला. या साखर कारखान्यामध्यें मात्र शेतकरी हाच जमिनीचा मालक असून तोच कारखान्याचाही मालक आहे. तेव्हां हा कारखाना अखंडपणें यशस्वी रीतीनें चालण्यास कांहींच अडचण नाहीं. या कारखान्याची उत्पत्ति बागाईतदार परिषदेंतून झाली असल्यामुळें व हा कारखाना माझ्या जिल्ह्यांत व तालुक्यांत सुरू झाला असल्यामुळें मला याबद्दल अभिमान वाटतो. आम्ही सर्व जरूर ती व शक्य ती मदत सतत करीत राहूं, असें मी आश्वासन देतों.

या नंतर बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँकेचे जॉइंट म्यानेजर साहेब मे. वाय. बी. गायतोंडे व श्री. गणपतराव रमाजी औताडे यांचीं उपदेशपर भाषणें झालीं.

### कारखान्यासंबंधीं महत्त्वाची माहिती

कार्यक्षेत्र ........ प्रवरा राईट बँक कॅनालवरील १२ गांवें व प्रवरा लेफ्ट बँक कॅनालवरील २३ गांवें.

कार्यक्षेत्रांत उसालायक जमीन, ११,००० एकर.

कार्यक्षेत्रांत उभा ऊंस, हल्लीं २,२०० एकर.

विकत घ्यावयाच्या फॅक्टरीची कार्यक्षमता, ५०० ते ६०० टन.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१. प्रोफेसर धनंजयराव गाडगीळ, एम. ए., एम. लिट., पुणें.

२. डॉ. आर. जी. काकडे, एम. ए., पीएच. डी., एलएल. बी., पुणें.

३. मे. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम., म्यानेजिंग डायरेक्टर, बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि., मुंबई.

४. मे. जे. एल. मेहता, बी. एस्सी., अंधेरी.

५. मे. विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील, लोणी बु.

६. कॅप्टन हंबीरराव अमृतराव मोहिते, हणमंतगांव.

७. मे. शंकरराव एकनाथराव घुमाळ, कोल्हार बु.

८. मे. गणपतराव रमाजी औताडे, पोहेगांव.

९. मे. यशवंतराव गोविंदराव टेकावडे, श्रीरामपूर.

१० मे. मुरलीधर गंगाराम:कडु पाटील, पाथरें बु.

११ मे. गोपाजी भिमाजी घोलप, पाथरें बु.

१२ मे. जगन्नाथ गणपत थेटे, भगवतीपूर.

१३ मे. आर. जी. सुळे, सी. आय. ई., बी. ए., एल. सी. ई.- पुणें, मॅनेजिंग डायरेक्टर.

जनरल सेक्रेटरी

श्री. एस. टी. तांबवेकर

—x—

## मशीन टूल्सच्या उत्पादकांच्या अडचणी

मशीन टूल्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एम्. वी. जांभेकर ह्यांचे भाषणः—

"सध्या ह्या धंद्यापुढें मोठ्या अडचणी उभ्या आहेत. गेल्या अठरा महिन्यांत मशीन टूल्सची विक्री एकसारखी घटत चालली आहे; आणि आतां तर विक्री जवळ जवळ थांबल्या सारखीच आहे. सर्व ग्रेड वन कारखानदारांनीं आपलें उत्पादन कमी केलें आहे. एकानें तर आपला कारखाना बंदच केला आहे. विक्री न झाल्यामुळें कारखानदाराजवळ मशीन टूल्स पडून राहिलीं आहेत. प्रत्येक कारखान्याच्या वसूल भांडवलाच्या जवळ जवळ ५० टक्के रक्कम पडून राहिलेल्या मालांत अडकून पडली आहे. उत्पादन बंद करून आणि विक्रीवरच लक्ष केंद्रित करून सुद्धा ह्या मशीन टूल्सचा उठाव होईल अशीं चिन्हें दिसत नाहींत.

"हिंदी गिऱ्हाइक कांहीं एका विशिष्ट कमी किंमतीलाच हिंदुस्थानांत बनविलेलीं मशीन टूल्स घेण्यास तयार आहे असें आम्हांला आढळून आलें आहे परंतु ही किंमत इतकी कमी आहे कीं, सोसण्यास अशक्य असें नुकसान करून घेण्याची तयारी असेल तरच त्या किंमतीला विक्री करणें कारखानदारांना शक्य होईल. ह्या किंमतीला विक्री करतां यावी म्हणून सरकारनें गिऱ्हाइकाला किंमतीच्या २० टक्के रक्कम द्यावी अशी सूचना कारखानदारांतर्फे करण्यांत आली होती. त्यामुळें उत्पादकांना आपली किंमत मिळून गिऱ्हाइकांना मात्र तितक्या प्रमाणांत कमी किंमत द्यावी लागली असती. सरकारनें ह्या सूचनेचा अद्याप स्वीकार केलेला नाहीं. अशा परिस्थितींत पडून राहिलेला सांठा लवकर संपविण्यासाठी किंमती कमी करणें एवढाच पर्याय ह्या धंद्याला राहिला आहे. परंतु ह्या उपायानें सर्व कंपन्यांच्या सांपत्तिक स्थितीवर फार विपरीत परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं."

---

## दि अमृत ऑइल मिल्स लि.

वरील कंपनीस अहवालाचे वर्षी (३१-३-४९ अखेर) २,९०,४७८ रु. नफा झाला. त्यांतून २,२५,००० रु. घसारा काढण्यांत आला. क्यु. प्रेफरन्स शेअर्संना ४½% करमाफ डिविहंडला ९०,००० रु. लागले. कंपनीनें एकूण ९१,१०,१८६ रुपयांची विक्री केली. कंपनी मुख्यतः वनस्पतीच्या उत्पादनाच्या व विक्रीचा व्यवहार करते. मॅनेजिंग एजंटांनीं आपलें २०,००० रु. कमिशन सोडलें आहे. कांहीं महिन्यांपूर्वी सरकारनें वनस्पतीच्या, मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामाची चौकशी करण्यासाठी कमिटी नेमली होती, तिचा रिपोर्ट अद्याप प्रसिद्ध झाला नसला तरी त्याबाबतच्या प्रयोगांवरून वनस्पतीचा दुष्परिणाम न होतां तें एक चांगल्यापैकीं अन्न आहे, असें आढळून आलें आहे, असा रिपोर्टांत उल्लेख आहे. कंपनी इतर मालाचें उत्पादन आतां वाढत्या प्रमाणावर करीत आहे. डहाणूकर सन्स लि. कडे अमृत ऑइल मिल्सची मॅनेजिंग एजन्सी आहे.

---

## अमेरिकन चित्रपटांची परदेशांत निर्मिती

अमेरिकन चित्रपट निर्माते १९४९ मध्यें २० पेक्षां अधिक चित्रपट परदेशांत तयार करीत आहेत. पैकीं तेरा पूर्ण झाले आहेत. ह्या चित्रपटांसाठी हिंदुस्थान, आफ्रिका, इंग्लंड, इटली, जर्मनी, फ्रान्स, अर्जेंटिना, इत्यादि देशांत निर्माते गेले आहेत.

---

बेडेकर पापड वापरा

भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार } अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

### दि कोल्हापूर गव्हर्मेंट सर्व्हंटस को. बँक लि., कोल्हापूर

३,०५५ सभासद, ७१,३९० रु. भांडवल, २,७५,८०० रु. ठेवी, ५३,२१० रु. रिझर्व्ह व इतर फंड ३,४९,०६७ रु. येणें कर्ज, थकबाकीचें प्रमाण १७.६%, हे वरील बँकेच्या ३० जून १९४९ असेरच्या हिशेब पत्रकांतील महत्त्वाचे आकडे आहेत. सभासद सरकारी नोकरांना त्यांच्या केवळ पगाराकडे पाहूनच बँक आर्थिक सहाय्य करते; तिच्या कर्जवसुलीस आतांपर्यंत जसें विशेष सहाय्य होत आलें, तसें ह्यापुढेंहि जिल्हाधिकारी करतील अशी आशा बोर्डानें व्यक्त केली आहे. अहवालाचे वर्षी निव्वळ नफा ३,०८२ रु. नीं वाढून तो ९,६९७ रु. झाला. बोर्डानें आपल्या अहवालांत प्रेसिडेंट श्री. पां. ह. हळदकर व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. श्री. जि. देशपांडे ह्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे.

---

### दि को. पीपल्स बँक लि., लिंब (जि. सातारा)

लिंबसारख्या खेडेगांवांत बँकेनें आपला व्याप जबाबदारीपूर्ण रीतीनें गेल्या १८ वर्षांत पुष्कळच वाढविला आणि म. गांधींच्या वधानंतरच्या वातावरणांत बँकेची कचेरी, कागदपत्र इत्यादि जळून गेलें असतांहि तिच्या कचेरीचें स्थलांतर करून बँकेची चिकाटीनें जोपासना केली, त्याचें सर्व श्रेय तिचे प्रेसिडेंट श्री. त्रिं. मा. ठाकूर व सेक्रेटरी श्री. बा. ग. अभ्यंकर ह्यांस आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें ५ लाखांवर उलाढाल करून १,३१० रु. नफा मिळविला. सातारा येथें मुख्य कचेरी नेली, तरी कोणाचीहि गैरसोय होऊ न देतां व्यवहार चालू आहेत, इतकेंच नव्हे तर ते वाढत्या प्रमाणावर आहेत, हें चालकांस भूषणावह आहे.

### औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग, पुणें

सदर वर्ग पुणें येथें जुलै–ऑगस्ट महिन्यांत झाला. परीक्षेला एकंदर ३५ विद्यार्थी बसले होते व त्यांपैकी २१ पास झाले. क्लास श्री. के. बी. देशपांडे, को. ट्रे. इन्स्पेक्टर व सौ. कुसुम पटवर्धन यांनीं चालविला.

यशस्वी उमेदवार

१ वाडेकर ना. तु., २ लिमये ह. कि., ३ बारमुख ह. स., ४ रिसबूड गो. ग., ५ जगदाळे म. द., ६ वेदपाठक सि. शं., ७ तळवळकर दि. गो., ८ मोरे बा. ब., ९ कुळकर्णी का. रा., १० सुपेकर म. सो., ११ वैद्य दि. य., १२ कुमठेकर के. सि., १३ कोल्हे तु. दा., १४ भंडारे रा. गो., १५ भोसले भि. तु., १६ पाटणकर व. बा., १७ पंधे द. वि., १८ जगनाडे ह. शं., १९ रहाळकर श्री. वा., २० उनवणे वि. पं., २१ शिंदे ह. बा.

---

### बार्शी सेंट्रल को. बँकेंत सहकारी दिन

बार्शी सेंट्रल को. बँकेतर्फे मे. कलेक्टरसाहेब जि. सोलापूर यांचे अध्यक्षतेखालीं ता. ५।११।१९४९ रोजीं बार्शी येथील "आशा" टॉकीजमध्यें २७ वा आंतर राष्ट्रीय सहकारी दिन जाहीर रीतीनें साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगीं पंढरपूर येथील मे. जोशी ॲडव्होकेट, एम्. एल्. ए. ह्यांनीं थोडक्यांत सहकारी तत्त्वाची महती सांगून बँकेचे डायरेक्टर श्री. भा. वि. विश्वरूपे वकील यांनीं अखिल भारतीय सहकारी दिनाचा संदेश वाचून दाखविला. सदर सहकारी दिनानिमित्त उपस्थित तालुक्यांतील सहकारी व शेतकरी बंधूंचे, त्याचप्रमाणें बार्शी येथील नागरिकांचे आभार श्री. आर. जी. परेडकर, बँकेचे व्हाइस-चेअरमन, यांनीं मानले.


## दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफीस- बेळगांव

(दक्षिण महाराष्ट्र व मुंबई-कर्नाटक मधील पहिलीच शेड्यूल्ड बँक)

**भांडवल**

| | |
|---|---|
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. ५,९०,०००/— |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,२७,०००/— |
| एकूण ठेवी | रु. ६०,००,०००चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ७६,००,०००चे वर |

**बँकेचीं वैशिष्ट्यें**

१. चोख व काटकसरीची व्यवस्था.
२. ठेवींच्या व्याजाचे आकर्षक दर व सर्व वर्गांना परवडतील अशा नव्या योजना.
३. डिव्हिडंडची शाश्वती.
४. उत्तरोत्तर होणारी समाधानकारक व निश्चित प्रगति.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार चोख, काळजीपूर्वक व योग्य मोबदल्यांत केले जातात.

**बँकेच्या इतर ठिकाणच्या शाखा**

बेळगांव जिल्हा–संकेश्वर, नंदगड, अथणी, होसूर, चिकोडी, टिळकवाडी, गोकाक, निपाणी कँप, बैलहोंगल.
रत्नागिरी जिल्हा–वेंगुर्ला, शिरोडा, कणकवली, देवगड, मालवण, चिपळूण, सावंतवाडी.
धारवाड जिल्हा—धारवाड, नरगुंद.
विजापूर जिल्हा—रामदुर्ग
कोल्हापूर जिल्हा—गडहिंग्लज
दक्षिण सातारा जिल्हा—मिरज

विशेष माहितीसाठीं लिहा अगर वरीलपैकी कोणत्याही शाखेंत चौकशी करा.

ह. सी. कुलकर्णी, बी. ए. मॅनेजर — गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी. चेअरमन


तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.